# वसई विरार शहर महानगरपालिका

**मा. स्थायी समिती सभा दिनांक २१/०७/२०१७**

**दु ११.३० वा.**

| अ. क्र. | विषयाचे नाव | स्थायी समिती सभेचा निर्णय |
|---|---|---|
| १. | मागील मा. स्थायी समिती सभा दि. ०७/०७ /२०१७ रोजीचे इतिवृत्त कायम करणे. | **ठराव** :- मागील मा. स्थायी समिती सभा दि. ०७/०७/२०१७ रोजीचे इतिवृत्त कायम करणेंत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. राजेंद्र कांबळी सूचक :- मा.श्री. वृंदेश पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| २. | प्रभाग समिती 'जी' अंतर्गत वॉर्ड क्र.७४ मधील नवजीवन उंच जलकुंभ ते धुमाळनगर परिसरात ३००/१५०/१०० मी.मी. व्यासाची सि.आय.जलवाहीनी पुरविणे, अंथरणे व जोडणेकामी येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत. | **ठराव** :- वरीलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा झाली. अमृत योजनेअंतर्गत संपूर्ण क्षेत्रात जलवाहिन्या टाकण्याचे प्रस्तावित आहे. त्यामुळे योजनेच्या संकल्पन व आराखड्यास हे काम धरुन आहे का याबाबत माहिती प्रस्तावात नमुद नसल्याने सदर माहितीसह प्रस्ताव ठेवण्यांत यावा तो पर्यंत सदर विषय ही सभा स्थगीत ठेवत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. वृंदेश पाटील सूचक :- मा.श्री. प्रशांत राऊत**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ३. | प्रभाग समिती एच मधील वॉर्ड नं.९३ अंबाडी रोड येथील जुने वाचनालय इमारतीचे पहिल्या व दुसऱ्या मजल्याचे दुरुस्ती करणे कामी अंदाजपत्रकास आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणे बाबत. | **ठराव** :- वरीलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त नमुद कामी होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देण्यांत येत आहे. तसेच पुढील निविदा कार्यवाहीस मान्यता देण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. पंकज पाटील सूचक :- मा.श्री. वृंदेश पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ४. | वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण समिती अंतर्गत | **ठराव** :- गोषवाऱ्यात नमुद केल्याप्रमाणे विविध ठेकेदारांमार्फत विविध साहित्य पुरवठा करणेकामी प्राप्त दर हे सर्वात कमी दर आहेत. सदर दराची बाजार भावाप्रमाणे पडताळणी केली असता दर बाजार भावाप्रमाणे योग्य व वाजवी आहेत. सदरचे निविदा दर मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखा परिक्षक यांनी तपासून मंजूरीस शिफारस केली आहे. त्यानुसार महाराष्ट्र |

| | | |
|---|---|---|
| | **अंगणवाडी व बालवाडी विद्यार्थ्यांसाठी सन २०१७-२०१८ या वित्तीय वर्षात साहित्य वाटपासाठी प्राप्त निविदा दरांपैकी सर्वात कमी दराच्या निविदेस मंजूरी देवून संविदा करणेस मान्यता देणे.** | महापालिका अधिनियम ७३(क) अन्वये सर्वात कमी दरांच्या ई-निविदाकारांबरोबर संविदा करुन आदेशित करण्यास व अंगणवाड्यातील मुलांना आवश्यकतेप्रमाणे साहित्य खरेदी करण्यास तसेच येणाऱ्या खर्चास ही सभा सर्वानुमते मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. चंद्रकांत गोरीवले सूचक :- मा.श्री. राजेंद्र कांबळी**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ५. | **महानगरपालिका हद्दीतील सर्वभाषिक शाळेतील (इंग्रजी माध्यम वगळून) शाळेत शिकणाऱ्या विदयार्थ्यां करिता महानगरपालिका परिवहन सेवेचा वार्षिक मोफत पास योजने करिता महिला व बालकल्याण विभागामार्फत ५०% अनुदान परिवहन सेवेस अदा करणे च्या मान्यते बाबत.** | **ठराव** :- महिला व बालकल्याण समितीच्या शिफारशीनुसार महानगरपालिका हद्दीतील जि.प.शाळेतील व सर्व भाषिक शाळेत (इंग्रजी माध्यम वगळून) शिकत असणाऱ्या ज्या विद्यार्थ्यांना महानगरपालिका परिवहन सेवेचा मे. भगिरथी यांच्यामार्फत वाटप करण्यात आलेल्या वार्षिक मोफत पास प्राप्त बिलाची मागणी रक्कम रु.५४,४२,५४०/- अदा करण्यात यावी व भविष्यात वेळोवेळी वाटप करण्यांत येणाऱ्या वार्षिक मोफत पासाचे वेळोवेळी बिलाच्या मागणी नुसार मे. भगिरथी यांनी बिल अदा करण्यांत यावे. याकामी सन २०१७-१८ या वित्तीय वर्षाकरीता अंदाजे ३,००,००,००० (अक्षरी रु. तीन कोटी मात्र) पर्यंत खर्चास ही सभा सर्वानुमते प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. चंद्रकांत गोरीवले सूचक :- मा.श्री. अजीत नाईक**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ६. | **वसई-विरार शहर महानगरपालिका महिला व बालकल्याण विभागामार्फत महिलांकरिता पारंपारिक वस्तूंच्या (आगोठीच्या वस्तुंच्या) बाजारपेठ उपलब्ध करुन देणे बाबत.** | **ठराव** :- उपरोक्त सादर केलेल्या प्रस्तावावर सविस्तर चर्चा करण्यांत आली व चर्चेदरम्यान सन्मा. सदस्यांनी उपस्थित केलेले मुद्दे व प्रशासनाने त्यावर केलेले खुलासे याचा विचार करता व एकंदर सभागृहाची भावना लक्षात घेता उपरोक्त विषयांकित सादर केलेला प्रस्ताव स्थगित ठेवावा अशी मा.स्थायी समिती ठरवित आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. अजीत नाईक सूचक :- मा.श्री. राजेंद्र कांबळी**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ७. | **प्रभाग समिती (जी) मधील वॉर्ड क्र. १०५ मध्ये जुचंद्र येथे आरोग्य केंद्रावर पाहिल्या मजल्याचे बांधकाम करणे याकामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत.** | **ठराव** :- सदर कामास मा.स्थायी समिती ठराव क्र. ०२ दि. २१/१०/२०१६ अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यांत आली आहे. सदर कामाची जाहीर निविदा प्रसिध्द करुन सकारात्मकदृष्ट्या मे.आर.व्ही.धोत्रे कन्स्ट्रक्शन ह्यांची निविदा अंदाजपत्रकापेक्षा १०.०१% कमी दराने निविदा लघुत्तम आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये ह्या कमी दराच्या निविदेस संविदा करणेंस मान्यता देण्याकरीता मा.आयुक्त ह्यांनी मा.स्थायी समिती महानगरपालिका अधिनियम ७३ (क) अन्वये संविदा करणेंस मान्यता देण्यात येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. पंकज पाटील सूचक :- मा.श्री. प्रशांत राऊत**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |

| | | |
|---|---|---|
| ८. | **प्रभाग समिती (जी) मधील वॉर्ड क्र.१०५ मध्ये जुचंद्र स्मशानभुमी मध्ये दहन शेड गोडाऊन व इतर कामे करणे याकामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणे बाबत.** | **ठराव** :- सदर कामास मा.स्थायी समिती ठराव क्र. ०२ दि. १४/१२/२०१६ अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यांत आली आहे. सदर कामाची जाहीर निविदा प्रसिध्द करुन सकारात्मकदृष्ट्या मे.आर.व्ही.धोत्रे कन्स्ट्रक्शन ह्यांची निविदा अंदाजपत्रकापेक्षा १०.०१% कमी दराने निविदा लघुत्तम आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये ह्या कमी दराच्या निविदेस संविदा करणेंस मान्यता देण्याकरीता मा.आयुक्त ह्यांनी मा.स्थायी समिती महानगरपालिका अधिनियम ७३ (क) अन्वये संविदा करणेंस मान्यता देण्यात येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. पंकज पाटील सूचक :- मा.श्री. प्रशांत राऊत**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ९. | **विरार (प.) प्रभाग क्र.३४ आगाशी टेपपाडा येथे सामाजिक सभागृह (बहुउद्देशीय हॉल) बांधणे. (मा.आ.श्री.हितेंद्रजी ठाकूर यांच्या फंडाअंतर्गत (सन२०१५-१६) या कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणे बाबत.** | **ठराव** :- उपरोक्त निविदांची तुलना करता विनायक भुपेंद्र यादव ह्यांची निविदा (अंदाजपत्रकापेक्षा ४.५०% जास्त दराने) सर्वात कमी व वाजवी आहे. त्यानुसार येणाऱ्या अंतिम प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळणेकरीता तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये ह्या कमी दराच्या निविदेस मा.आयुक्त ह्यांनी मंजूरी दिली आहे. याकामी म.न.पा.तर्फे कायदेशीर बाबींची पुर्तता करुन संविदा करणेसाठी ही सभा मान्यता देत आहे व याकामी येणाऱ्या खर्चास अंतिम प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. पंकज पाटील सूचक :- मा.श्री. चंद्रकांत गोरीवले**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| १०. | **सन २०१७-१८ या वित्तीय वर्षात महानगरपालिका हद्दीतील भटक्या/ जखमी कुत्र्यांना पकडून त्यांचेवर निर्बिजीकरण शस्त्रक्रिया करणे व रॅबीज प्रतिबंधक लस देणे कामी आलेल्या ई निविदेमधील लघुत्तम दराच्या निविदेस संविदा करणेसाठी मान्यता मिळणेबाबत.** | **ठराव** :- सन २०१७-१८ या वित्तीय वर्षात महानगरपालिका हद्दीतील भटक्या/जखमी कुत्र्यांना पकडून त्यांचेवर निर्बिजीकरण शस्त्रक्रिया करणे व रॅबीज प्रतिबंधक लस देणेकामी आलेल्या निविदेमधील उत्कर्ष स्टार मित्र मंडळ, मुलूंड (प.) मुंबई यांची नर कुत्र्यावर निर्बिजीकरण शस्त्रक्रिया करणे व रॅबीज प्रतिबंधक लस देणे कामी रु. ९००/- व मादी कुत्र्यांवर निर्बिजीकरण शस्त्रक्रिया करणे रॅबीज प्रतिबंधक लस देणेकामी रु. १,०००/- प्रति श्वान दर ही सभा मंजूर करीत आहे. उत्कर्ष स्टार मित्र मंडळ, मुलूंड (प.) मुंबई यांचेकडून मंजूर दराने भटक्या/जखमी कुत्र्यांना पकडून त्यांचेवर निर्बिजीकरण शस्त्रक्रिया करणे व रॅबीज प्रतिबंधक लस देणे काम करुन घेण्यांत यावे. भटक्या/जखमी खुत्र्यांवर निर्बिजीकरण शस्त्रक्रिया केल्यानंतर वेळोवेळी येणारे बील अदा करण्यांस ही सभा मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. वृंदेश पाटील सूचक :- मा.श्री. प्रशांत राऊत**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |

| | | |
|---|---|---|
| ११. | **शालेय व आतंर जिल्हा क्रीडा स्पर्धा २०१७-१८ ऑनलाईन प्रक्रिया राबवणेस मान्यता मिळणेबाबत.** | **ठराव** :- उपरोक्त विषयावर सभागृहात सविस्तर चर्चा करण्यांत आली. त्यानुसार सर्व जिल्हा क्रीडा अधिकारी तसेच सर्व महानगरपालिका क्रीडा अधिकारी यांनी क्रीडा विभागाचे कामकाज एकसारखे, पेपरलेस, सुटसुटीत व विनाविलंब होण्यासाठी तसेच राज्यातील, जिल्हयातील शासनाच्या विविध योजना त्या संबंधित विविध उपक्रमांची तात्काळ सर्व महानगरपालिका क्रीडा विभागांना, सर्वसामान्य खेळाडूंना तसेच क्रीडा शिक्षकांना तात्काळ उपलब्ध होण्यासाठी मुंबई विभागाच्या स्तरावर मे. एज्युस्पोर्टस इन्फोसर्व एल.एल.पी. ठाणे यांनी www.mumbaidivsports.com हे वेबबेस सॉफ्टवेअर तयार केले आहे. मा. उपसंचालक मुंबई विभागाच्या वतीने एज्युस्पोर्टस् इन्फोसर्व एल.एल.पी. या कंपनीद्वारे सॉफ्टवेअर सादरीकरण करण्यास मान्यता दिलेली आहे. सदर ऑनलाईन वेब ॲप्लिकेशन सॉफ्टवेअर करार पध्दतीने एज्युस्पोर्टस् इन्फोसर्व एल.एल.पी. ठाणे यांचेकडून घेण्यासाठी प्रस्तावातील नमुद दरपत्रकास आजची ही सभा मंजुरी देत आहे. त्यानुसार मे. एज्युस्पोर्ट्स इन्फोसर्व एल.एल.पी. ठाणे यांचेकडून तयार करण्यांत आलेला जिल्हा क्रीडा स्पर्धा ऑनलाईन वेब ॲप्लिकेशन सॉफ्टवेअर वेबबेस लिंक एक वर्षाकरीता खरेदी करुन, त्यांचेशी करारनामा करणेस, कामाचा कार्यादेश देणेस तसेच त्यांचे कामाचे होणारे देयक अदा करणेकामी आजची ही सभा आर्थिक व प्रशासकीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. वृंदश पाटील सूचक :- मा.श्री. सुदेश चौधरी**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| १२. | **वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती "जी" जूचंद्र क्षेत्रातील दैनंदिन व आठवडा बाजार शुल्क ठेका पध्दतीने वसूली करणेबाबत.** | **ठराव** :- वरीलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होऊन, प्राप्त निविदांपैकी अ.क्र. २ मे क्लासिक एंटरप्रायजेस यांची निविदा जादा दराची आहे. माहे ऑगस्ट २०१७ ते माहे मार्च २०१८ या ८ महिन्याकरीता वार्षिक रक्कम रु. १०,७०,१००/- (अक्षरी रु. दहा लाख सत्तर हजार शंभर मात्र) प्रमाणे रक्कम रु. ७,१३,४००/- ज्यादा दराची रक्कम आहे. तरी महानगरपालिकेस त्याचा फायदा होणार आहे. तरी निविदाकार मे.क्लासिक एंटरप्रायजेस जास्त रक्कमेच्या निविदेस प्रशासकीय व वित्तीय मंजूरी असलेल्या निविदेस आजची सभा मान्यता देत आहे. सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरीता महानगरपालिकेच्या अटी व शर्तीस अधिन राहून जूचंद्र विभाग कार्यक्षेत्रातील दैनंदिन व आठवडा बाजार कर वसूली ठेका देण्यास आजची सभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. चंद्रकांत गोरीवले सूचक :- मा.श्री. पंकज पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| १३. | **महाराष्ट्र नागरी सेवा (वैद्यकिय परिचर्या) नियम १९६१ अन्वये श्री. प्रकाश नाना पाटील, शिपाई यांचे कुटुंबाचे वैद्यकिय खर्चाची प्रतीपुर्ती करणेस मंजुरी मिळणे बाबत.** | **ठराव** :- वरीलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होऊन नालासोपारा विभागीय कार्यालयीन श्री.नाना. प्रकाश पाटील, शिपाई यांच्या पत्नीच्या वैद्यकिय बिलाची प्रतिपुर्ती रक्कम रु. १,७९,४५९/- मात्र श्री. प्रकाश नाना पाटील यांना अदा करणेस ही सभा वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. चंद्रकांत गोरीवले सूचक :- मा.श्री. पंकज पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |

| | | |
|---|---|---|
| १४. | <u>**वसई विरार शहर महानगरपालिकेतील अस्तित्वात असलेल्या उद्यानांची माहिती चित्रपट (डॉक्युमेंट्री व्हिडीओ) तयार करणेबाबत. (सामाजिक जागृतीचा संदेश उद्यानांची निगा राखणेबाबत.)**</u> | **ठराव** :- सदर सभेमधे साधक-बाधक चर्चा करणेत आली. वसई विरार शहर महानगरपालिका ९ प्रभाग समिती कार्यक्षेत्रामधील उद्याने सुव्यवस्थितपणे ठेवणेकरीता नागरीकांमध्ये जनजागृती करणेसाठी तसेच उद्याने सुशोभित ठेवणेच्या दृष्टीकोनातून उद्यानांचा, दुभाजके व एफ.डी.सी.एम मार्फत शिरगाव डोंगर येथील अवनत वनक्षेत्रावर करणेत आलेल्या वृक्षलागवडीबाबत माहिती चित्रपट <u>(डॉक्युमेंट्री व्हिडीओ)</u> बनविणेस ही सभा सर्वानुमते प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. वृंदेश पाटील सूचक :- मा.श्री. सुदेश चौधरी**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| १५. | <u>**वृक्ष लागवड व वृक्ष संवर्धन यांची माहिती देणारे पुस्तके खरेदीबाबत.**</u> | **ठराव** :- सदर सभेमध्ये साधक - बाधक चर्चा करणेत आली. वसई - विरार शहर महानगरपालिका मा.आयुक्त साो., यांना अनुसुचि ड मधील प्रकरण ५ संविधा ५ (२) २ नुसार निविदा न मागविता संविधा करणेस असलेल्या अधिकारान्वये ही सभा वृक्ष लागवड व वृक्ष संवर्धन यांची माहिती देणारी पुस्तके श्री.प्रकाश काळे यांचे कडून खरेदी करणेच्या प्रस्तावास व होणाऱ्या अनुषंगिक खर्चास सर्वानुमते प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. वृंदेश पाटील सूचक :- मा.श्री. सुदेश चौधरी**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |

**नगरसचिव**

**वसई- विरार शहर महानगरपालिका**